PUBLICATION – SAKAL
DATE – OCTOBER 04, 2019
PAGE NO. – 9 (PUNE TODAY)

100% PUBLIC RELATIONS



पुणे : दुर्गा पुरस्कार पूजा घनसरवाड यांना डॉ. अभिजित सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) सुप्रिया दामले, घनसरवाड, डॉ. सोनवणे आणि डॉ. मनीषा सोनवणे.

# भिक्षेकऱ्यांना भीक देण्यापेक्षा स्वावलंबी बनवा : डॉ. सोनवणे

पुणे : "आयुष्यात कोणालाही भीक देऊ नका, पण मदत मात्र नक्की करा. भिक्षेकऱ्यांना भीक देणे बंद केले तरच ते पोटापाण्यासाठी पर्याय शोधतील. म्हणून भीक देऊन परावलंबी करण्यापेक्षा मदत करून स्वावलंबी बनवा," असे आवाहन भिक्षेकऱ्यांचे डॉक्टर म्हणून ओळखले जाणारे आणि सोहम ट्रस्टचे डॉ. अभिजित सोनवणे यांनी केले. स्मशानात जळणाऱ्या चितेच्या प्रकाशात अभ्यास करून दहावीत घवघवीत यश मिळविणाऱ्या पूजा घनसरवाड यांचा हिंदू महिला सभेच्या वतीने दुर्गा पुरस्काराने गौरव करण्यात आला. डॉ. सोनवणे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हिंदू महिला सभेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले, सोनवणे यांच्या पत्नी डॉ. मनीषा सोनवणे, रोहिणी नामजोशी पांढरे, वसुधा मेहंदळे आदी या वेळी उपस्थित होते.